नियमीत फौ. ख. क्र. ४६/२०२२
सरकार वि. सुरेश + १
निशाणी– २७.

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

**<u>माझे नाव</u> –** कैलास मधुकर बागूल,
**<u>वय</u>–** ६१ वर्ष– धंदा– सेवानिवृत्त.
**<u>राहणार</u> –** मनमाड, ता. नांदगाव, जि. नाशिक.

.................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०१.** मी दिनांक ०२/०२/२०२२ रोजी दिघवद येथे मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत होतो. मी त्यावेळी तहसील कार्यालयात होतो. मला तलाठी नेव्हल यांनी फोन करुन हिरापूर येथून अनाधीकृतपणे मुरुमची वाहतूक चालू आहे. त्यावेळी त्यांनी मला कोलटेक फाटयावर बोलाविले. मी त्यानंतर कोलटेक फाटयावर पोहोचलो. त्या ठिकाणी तलाठी नेव्हल थांबले होते. त्यानंतर हिरापूर कडून साधारण १२.३० ते १.०० वाजताच्या दरम्यार एक हायवा क्रं. एम. एच. १६–ए. इ.– ६१८१ आला. आम्ही तो हायवा थांबवला. त्यावेळी त्यात हायवा गाडीत मुरुम होता. आम्ही चालकाला मुरुमच्या वाहतुकीचा परवान्याबाबत विचारपूस केली. त्यावेळी त्याने त्याच्याकडे मुरुम वाहतूकीची परवानगी नसल्याबाबत सांगितले. त्यावेळी त्यांना आम्ही हायवा तहसील कार्यालयात घेवून चालण्यास सांगितले. त्यावेळी चालकाने गाडी तहसील कार्यालयात नेत नाही असे सांगून हुज्जत घातली. त्यानंतर चालकाने गाडी मालकाला फोन केला. त्यानंतर गाडी मालक त्या ठिकाणी आला. मालकालाही आम्ही परवाना नसल्याने गाडी तहसील कार्यालयात घेवून चालण्यास सांगितले. त्यांनीही आमचे ऐकले नाही व तेवढया वेळात चालक गाडी लासलगावकडील रस्त्याकडे घेवून गेला. त्यानंतर आम्ही चांदवड येथे निघूण आलो. त्या ठिकाणी तलाठी नेव्हल यांनी पंचनामा केला होता. तहसील कार्यालयात येवून आम्ही तहसील दारांना त्याबाबत माहिती दिली. तहसीलदारांनी तलाठयांना आदेश दिला. गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. आज न्यायालयात गाडी मालक हजर आहे. गाडी चालकास पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०२.** त्या दिवशी तहसील कार्यालयात मिटींग बाबत माहिती देत होतो. मला तलाठी नेव्हल यांचा क्रमांक तोंड पाठ नाही. तहसील कार्यालयात कशासाठी गेलो याबाबत लेखी दाखल करु शकत नाही. साक्षीदार सांगतो की, माहिती देण्याकरीता गेलो होतो. मी पंचनाम्यावर सही केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याबाबत व्यैयक्तीक माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गटात अंतर्गत विहीरीचा मलमा उचलण्याकरीता परवानगीची आवश्यकता नसते. ज्या ठिकाणावरुन माल उचलला होता त्या ठिकाणी मी प्रत्यक्ष भेट दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माल कुठून आणला याबाबत व्यैयक्तीक चौकशी केली नाही. माल कुठून आणला याबाबत मी व तलाठयाने प्रत्यक्ष जागेवर चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्या घटनेच्या वेळी मी त्या ठिकाणी नव्हतो म्हणून कोणत्याही दस्तावर माझ्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पोलिस स्टेशनला बोलावून संगनकावर माझा जवाब घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस माझ्याकडे जवाब घेण्याकरीता आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तलाठयाने हायवातून जात असलेल्या मुरुमाची शहानिशा न करता आरोपी विरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्हांला शासकीय जागेवर खोदकाम सुरु असल्याबाबत माहिती मिळाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी जागेवरुन मुरुम उचलला हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

वा. दा. कबूल केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.10.09 18:23:38 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड .**

समक्ष,

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.10.09 18:23:59 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**दि. ०९/१०/२०२५.**

**चांदवड.**